स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,  नांदेड
उपपरीसर, लातूर

# लातूर जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांना संयुक्त गट ब व क परीक्षेची तयारी मराठीतून ऑनलाइन पद्धतीने प्रशिक्षण देणेकामी अनुभवी संस्थेची (अशासकीय/खाजगी) निवड (Empanelment)

ई-निविदा

सन २०२५ -२६

प्रेषकः
कुलसचिव,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,  नांदेड

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

'ज्ञानतीर्थ' विष्णुपूरी, नांदेड

ई-निविदा क्र.संपदा/उपपरिसर/लातूर/२०२५-२६/ई-निविदा क्र.४२-२०२५

## जाहीर ई-निविदा सूचना

कुलसचिव स्वा.रा.ती म.विद्यापीठ, नांदेड हे '' **लातूर जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांना संयुक्त गट 'ब' व 'क' परीक्षेची तयारी मराठीतून ऑनलाइन पद्धतीने प्रशिक्षण देणेकामी अनुभवी संस्थेची (अशासकीय/खाजगी ) निवड (Empanelment ) बाबत''** या कामासाठी इच्छूक परवानाधारकाकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे. इच्छुक परवानाधारकांनी निविदेबाबत संपुर्ण माहीती शासनाच्या **https://mahatenders.gov.in** आणि **www.srtmun.ac.in** या संकेतस्थळावर दिनांक **१०/१२/२०२५ रोजी दुपारी १५.०० ते दिनांक २४/१२ /२०२५ दुपारी १५.०० वाजेपर्यंत** पाहता येईल, डाउनलोड करता येईल व निविदा भरता येईल. निविदेसंबधीत यापूढील सर्व सूचना/शुध्दीपत्रक/मुदतवाढ देणे, त्यात कांही बदल हे केवळ प्रस्तुत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर व महाटेंडर वेबसाईटवर प्रसिध्द केले जातील. तसेच कोणतीही निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.

संदर्भ : संपदा/उपपरिसर, लातूर/प्रशिक्षण /ई-निविदा क्र.४२-२०२५/२०२५-२६/ ५९८
दिनांक : १०/१२/२०२५

कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

प्रत:

१) जनसंपर्क अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ यांना प्रत देउन कळविण्यात येते की, सदर निविदा सूचना '' **हिंन्दुस्थान टाईम्स् (महाराष्ट्र), दै. पुण्यनगरी (मराठवाडा) व दै.भास्कर (मराठवाडा)''** या वर्तमानपत्रात प्रसिध्द करावी.
२) सिनीयर प्रोग्रामर, संपदा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना प्रत देउन कळविण्यात येते की, सदर निविदापुस्तिका विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.
३) सूचना फलक, प्रशासकिय इमारत, प्रस्तुत विद्यापीठ
४) सूचना फलक, संपदा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ

कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

कुलसचिव,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

लातूर जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांना संयुक्त गट ब व क परीक्षेची तयारी मराठीतून ऑनलाइन पद्धतीने प्रशिक्षण देणेकामी अनुभवी संस्थेची (अशासकीय/खाजगी ) निवड (Empanelment )करणेसाठी जाहीर ई-निविदा

संदर्भ:

१) शासन निर्णय क्रमांक डिएपी १००७ /प्र.क्र.३९ /का. १४४४ दिनांक १६.०२.२००८

२) महाराष्ट्र शासन , अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६, जिल्हा योजना, लातूर

३)महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. डीएपी १०२५/प्र.क्र.३०६/का.१४८१दि.०४.०८.२०२५

४) जिनिस/ओ/२०२५/एए ओ/०१७०१, दिनाक २७/१०/२०२५

संचालक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड , उपपरीसर लातूर यांच्याकडून संयुक्त गट ब व क परीक्षेची तयारी मराठीतून तयारीसाठी ३ महिने कालावधीसाठी ( ३ महिने फाउंडेशन + MPSC पुर्व परीक्षा कमंबाइन पुर्व व मुख्य) लातूर जिल्ह्यातील युवक व युवतीसाठी ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम अशासकीय / खाजगी संस्थामार्फत राबविण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षण / कोचिंग कार्यक्रम राबविण्यासाठी ऑनलाइन कोचिंग देण्यासाठी अशासकीय / खाजगी संस्थाची (सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० किंवा संस्था नोंदणी अधिनियम नुसार पंजीबद्ध किंवा नोंदणीकृत प्रायव्हेट लिमीटेड कंपनी किंवा प्रोप्रायटर फर्म नोंदणीकृत असणा-या संस्था / प्रोपराईटर फर्म) निवड (Empanelment) करण्यासाठी डबल बीड पध्दतीने (तांत्रीक ) ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| प्रशिक्षण / कोचिंग चा तपशील | निविदा फॉर्म किंमत | बयाणा रक्कम |
|---|---|---|
| लातूर जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांना संयुक्त गट ब व क परीक्षेची तयारी मराठीतून ऑनलाइन पद्धतीने प्रशिक्षण देणेकामी अनुभवीसंस्थेची (अशासकीय/खाजगी ) निवड (Empanelment ) | रु. २०,००० /- | रु. २,००,०००/- |

निविदेचे वेळापत्रक

| अ क्र | प्रकल्प स्तरीय स्टेज | प्रारंभ | | अंतिम | |
|---|---|---|---|---|---|
| | | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
| १ | निविदा प्रकाशीत करणे | ०९/१२/२०२५ | १५:०० | १०/१२/२०२५ | १५:०० |
| २ | निविदा डाऊनलोड करणे | १०/१२/२०२५ | १५:०१ | २४/१२/२०२५ | १५:०० |
| ३ | निविदा सादर करणे | १०/१२/२०२५ | १५:०० | २४/१२/२०२५ | १५:०० |
| ४ | निविदा पूर्व बैठक दिनांक | १६/१२/२०२५ | ११:०० | -- | -- |
| ५ | लिफाफा क्र. १ उघडणे (शक्य झाल्यास) | २६/१२/२०२५ | १५:०० | -- | -- |
| ६ | लिफाफा क्र. २ उघडणे (शक्य झाल्यास) | २७/१२/२०२५ | १५:०० | -- | -- |

१) संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाव्दारे होणार असून, निविदा सूचना, अटी व शर्ती इ. माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२) निविदा सादर करु इच्छिणाऱ्या पुरवठादाराने https://mahatenders.gov.in, येथे नोंदणी करावी.

३) निविदाधारकांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी व डिजीटल सर्टीफिकेट संदर्भात काही अडचणी असल्यास त्यांनी पुढील नंबरवर संपर्क साधावा ०१२०-४००१००२, ०१२०-४००१००५, ०१२०- ६२७७ ७८७ Email: gproc.support maharashtra.gov.in

४) निविदा, निविदेच्या सूचना, अटी, शर्ती व शुध्दीपत्रक https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. १०/१२/२०२५ दु. ०३.०० ते दि. २४/१२/२०२५. वेळ दु., ०३.०० या कालावधीत उपलब्ध राहतील.

५) ई-निविदा सादर करण्याचा कालावधी दि. १०/१२/२०२५ दु. ०३.०० ते दि. २४/१२/२०२५. वेळ दु., ०३.००.वाजेपर्यंत राहिल.

६) निविदापूर्व बैठक (प्री बिड मिटींग) दिनांक १६/१२/२०२५ वेळ स. ११.०० वाजता वित्त व लेखाधिकारी , स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, या कार्यालयात घेण्यात येईल. निविदा धारकांना सदर बैठकीस उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

७) इच्छुक निविदाधारकाने निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

८) निविदाधारकाने निविदा भरते वेळी निविदा फी व बयाना रक्कम भरणे आवश्यक आहे.

९) सदर निविदा मंजूर करणे, निविदा उघडण्याचा दिनांक पुढे ढकलणे तसेच निविदा प्रक्रियेत बदल करणे अथवा संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करणे इत्यादी बाबतचे संपूर्ण हक्क व निर्णय स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, यांना राहतील.

१०) निविदा स्वीकारण्याचे, उघडण्याच्या तारखेमध्ये व वेळेमध्ये बदल करण्याचे तसेच संस्थेची निविदा कोणतेही कारण न दाखवित्ता अंशतः किंवा पूर्णतः मंजूर करण्याचे अधिकार किंवा नामंजूर करण्याचे अधिकारअथवा कोणतेही कारण न देता निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी राखून ठेवले आहेत.

११) इंटरनेट, विद्युत पुरवठा, संगणक बिघाड अथवा इतर कारणामुळे निविदा सादर करण्यास विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित पुरवठादार संस्था/ कंत्राटदार यांची राहिल, सदर जबाबदारी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांची राहणार नाही.

१२) निविदा कोणत्याही स्तरावर कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी राखून ठेवला आहे.

१३) तांत्रिक मूल्यांकनाच्या आधारे कोचिंग संस्थांना पॅनेलमध्ये समाविष्ट केले जाईल.

१४) उप-कंत्राटदारीला परवानगी नाही.

कुलसचिव,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

खालील कारणास्तव निविदा नाकारण्यात येतील,

१. निविदा फॉर्म अर्धवट / अपु-या माहितीसह सादर केल्यास.

२. निविदेमध्ये दिलेली बयाणा रक्कम रुपये ऑनलाईन भरणा करुन त्याचे चलन सोबत सादर केलेले नसल्यास.

३. आवश्यक ती सर्व कागदपत्रे ऑनलाईन सादर केलेली नसल्यास.

४. दराबाबत संदिग्धता असल्यास.

५. निविदाधारकाने निविदेमध्ये काही अटी व शर्ती नमूद केल्यास.

६. कोणत्याही प्रकारचा दबाव अथवा कोणत्याही मार्गाने निविदा स्वीकृतीसाठी प्रयत्न केल्यास.

७. कामाचे कार्यादेश आणि इतर कागदपत्रे खोटे आढळल्यास निविदा रद्द करण्यात येईल व फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल व अशा निविदाधारकांचे नाव काळ्या यादीत समावेश केला जाईल.

८. जर निविदा खरेदी करणारा (म्हणजेच, जो निविदा शुल्क आणि ईएमडी भरतो) आणि निविदा सादर करणारावेगळे असतील.

कुलसचिव,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

## निविदेच्या अटी व शर्ती

१) निविदाधारकाने निविदा भरतेवेळी निविदा फी व बयाना रक्कम भरणे आवश्यक आहे. ई-निविदा भरतेवेळो जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे ई-निविदा शुल्क रुपये २५,०००/- व बयाणा रक्कमरु. २,००,०००/- क्रेडीटकार्ड/डेबीटकार्ड/नेटबँकीग/आर. टी. जीएस (RTGS) / एन.ई.एफ.टी (NEFT) च्या व्दारे ऑनलाईन पद्धतीने भरणे अनिवार्य आहे.

२) ई-निविदा Double बीडपध्दतीने (तांत्रीक व व्यावसायीक) सादर करावयाचे आहे.

३) सदर प्रशिक्षण कार्यक्रम हा जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत नाविन्यपूर्ण योजनेमध्ये राबविण्यात येत असल्याने ही निविदा शासन निर्णय क्रमांक डिएपी १००७ /प्र.क्र.३९ /का. १४४४ दिनांक १६.०२.२००८ मधील अटी व शर्तीच्या अधीन असेल, निविदाधारकाने निविदा भरण्याआधी हा शासन निर्णय वाचून घेणे अपेक्षित आहे. नियोजन विभागाचा सदर शासन निर्णय https://gr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

४ ) अभ्याससाहित्य हे निविदा सादर करणाऱ्या संस्थेने स्वतः तयार केलेले असावे. अन्यथा सदर संस्थेचे आवेदन ग्राह्य धरले जाणार नाही, निवड झालेल्या संस्थेने हे अभ्यास साहित्य सर्व विद्यार्थ्यांच्या पीडीएफ स्वरुपात उपलब्ध करून द्यावयाचे आहे,

५ ) तांत्रिक लिफाफ्यासाठी अनिवार्य कागदपत्रे पुढीलप्रमाणे : -

१. निविदा फॉर्म अ
२. निविदा फी व बयाणा रक्कम भरणा केल्याची संगणकीकृत पावती
३. प्रशिक्षण संस्था नोंदणी प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे
४. संस्था PAN व जीएसटी नोंदणी क्रमांक
५. संस्थेचे मागील तीन वर्षाचे आयकर विवरण पत्र ( सनदी लेखापाल प्रमाणित )
६. संस्थेची मागील तीन वर्षातील सरासरी आर्थिक उलाढाल ही किमान ६०.०० लक्ष असावी with UDIN
७. संस्थेस काळ्या यादीत न टाकल्याबाबत / बंदी न घातल्याबाबतचे संस्थेच्या letterhead घोषणापत्र सादर करणे बंधनकारक आहे.
८. प्रशिक्षण संस्था पात्र ठरल्यास प्रशिक्षणासाठी आवश्यक असणारे सुविधायुक्त (सुसज्ज, स्वच्छ, हवादार) वर्ग, डिजिटल इंटरॅक्टिव्ह पॅनल, हायस्पीड इंटरनेट इत्यादी असणे गरजेचे आहे. त्या सुविधांचा व्हिडिओ केलेली छायाचित्रे सोबत जोडणे आवश्यक आहे. (किमान ३०० चौ.फूट सुसज्ज ऑनलाईन स्टुडिओ असणे आवश्यक आहे.) जागा स्वतःची मालकीची / भाड्याची असणे बंधनकारक राहील. संस्थेची निवड झाल्यास मालमत्ता कर पावती व तद्नंतर असल्यास तर नोंदणीकृत केलेला भाडेकरार कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, यांचेकडे निवड झाल्यानंतर सादर करणे बंधनकारक असेल.
९. प्रशिक्षण संस्थेकडे आवश्यक प्रमाणात अंशकालीन अनुभवी तज्ञ प्रशिक्षक असणे आवश्यक आहे.
१०. प्रशिक्षण संस्थेचा अनुभव संबंधित संस्थेत प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षकांची / व्याख्यात्यांची यादी तसेच त्यांचा शैक्षणिक दर्जाचा अनुभव यासंबंधी सविस्तर माहिती "परिशिष्ट क (२)" मध्ये सादर करणे आवश्यक आहे.
११. संयुक्त गट ब व क आणि इतर तत्सम स्पर्धा परीक्षांसाठी प्रशिक्षण कार्यामध्ये ५ वर्षे वरील अनुभव असणे आवश्यक आहे. संयुक्त गट ब व क शासकीय सेवेत निवड झालेल्या उमेदवारांची यादी "परिशिष्ट ड " मध्ये निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. (सदर माहिती अभावी संस्थेचे आवेदन ग्राह्य धरले जाणार नाही व ३० उमेदवार संयुक्त गट ब व क परीक्षेत निवड झाल्याचे नमूद करणे आवश्यक आहे.)
१२. प्रशिक्षण संस्था शासनाच्या निर्देशांनुसार निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी पात्र असणे आवश्यक आहे.

१३.परिशिष्ट ब  प्रमाणे Letter Head अटी व शर्ती मंजूर असल्याबाबतचा बंधपत्र सर्व माहिती व कागदपत्रांसह स्कॅन करून सादर करणे बंधनकारक आहे.

१४.निविदेसोबत विषय निहाय महिनानिहाय अभ्यासाचे वेळापत्रक सादर करणे आवश्यक आहे.

१५.यशस्वी निविदादारासोबत करारनामे झाल्यानंतर नमूद रकमेच्या मूल्याच्या ५% प्रमाणात अनामत रक्कम कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड नावे डिमांड ड्राफ्ट स्वरूपात ७ दिवसांच्या आत जमा करावी लागेल.

**६) प्रशिक्षण बाबत कार्यक्रमाची संक्षिप्त माहिती :-**

१. प्रशिक्षण कार्यक्रम नक्की काय आहे?

२००० अर्जदार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण द्यायचे असल्याने अर्ज प्राप्त होण्यासाठी विशिष्ट असा अंतिम दिनांक ठेवण्यात येणार नाही. विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी करून घेतले जाईल.

सर्व लेक्चर्स रेकॉर्डेड स्वरुपात ऍपवर उपलब्ध असायला हवेत. निवड झालेल्या १०० विद्यार्थ्याची अशी २० बच (Bach) करायची आहे.

२. ऑनलाइन कोचिंगमध्ये समाविष्ट करावयाचे विषय :- (Syllabus)

| | |
|---|---|
| १ | सामान्य अध्ययन |
| २ | गणित व बुद्धिमत्ता |
| ३ | मराठी |
| ४ | इंग्रजी |

**३. प्रशिक्षणार्थींची निवड -:**

लातूर जिल्ह्यातील बारावी झालेल्या पदवी शिक्षण घेत असलेल्या आणि पदवी पूर्ण केलेल्या कोणत्याही विद्यार्थ्याला या योजनेचा लाभ घेता येईल यासाठी त्यांची नोंदणी करून घेतली जाईल आणि त्यानंतर प्रशिक्षणाला त्यांना प्रवेश दिला जाईल. महाविद्यालयामध्ये जाऊन त्यांची नोंदणी करून घेण्यासाठी संस्थेला अधिकार देण्यात येतील व नोंदणीची संपूर्णजबाबदारी ही संस्थेची राहील

४. प्रशिक्षण कालावधी : संयुक्त गट ब व क परीक्षेसाठी ३ महिन्यांच्या कालावधीमध्ये

५. प्रशिक्षणाचे माध्यम : मराठी माध्यम

६. प्रशिक्षणाचे स्वरूप ऑनलाईन स्वरूप

७. प्रशिक्षण संस्थेची जबाबदारी

a) संयुक्त गट ब व कपरीक्षांसाठी अँड्रॉइड ऍप्लिकेशन्स विकसित करणे.

b) निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रशिक्षण देणे.

c) नियमित सराव परीक्षा घेणे.

D) विद्यार्थ्यांच्या निवड प्रक्रियेमध्ये संस्थेचा सहभाग बंधनकारक असेल. तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाबाबत माहिती व्हावी यासाठी विविध माध्यमांद्वारे जागरूकता पसरवण्याची व किमान पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज येऊन त्यांनापरीक्षेचे प्रशिक्षण दिले जाईल याची जबाबदारी प्रशिक्षण संस्थेची असेल.

f) स्पर्धा परीक्षांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागवून संयुक्त गट ब व क पूर्व प्रशिक्षणासाठी १२ वी मधील गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार निवड करून त्याबाबत अंतिम अहवाल संचालक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, उपपरीसर लातूर यांना सादर करण्याची जबाबदारी प्रशिक्षण संस्थेची असेल.

**७) संचालक, उपपरीसर लातूर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, यांमार्फत सनियंत्रण-**

१. प्रशिक्षण कालावधीत संचालक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, उपपरीसर लातूर यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी अथवा कर्मचारी व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी यांना, अचानक संस्थेला भेट देवून पहाणी करण्याबाबतचे अधिकार राहतील.

२. ई-निविदा मंजूर झाल्यास नोंदणी व निवड केलेल्या संस्थेस कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, यांनी निर्देशित व सुचित केल्यानुसार लेखी करार करावा लागेल.

३. संस्थेच्या कामावर सनियंत्रण ठेवणे, मुल्यमापन करणे व लेखापरिक्षणा बाबतची कार्यवाही करणे इ. बाबींचे अधिकार संचालक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, उपकेंद्र लातूरयांचेकडे राहतील.

४. निविदाधारक संस्थेच्या ऑनलाइन केंद्रामध्ये काही अडचणी निर्माण झाल्यास, संस्था अयोग्य आहे असे आढळल्यास संस्थेचे प्रशिक्षण केंद्र कोणत्याही टप्प्यावर बंद करण्याचा अधिकार कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, यांनी राखुन ठेवला आहे. तेथून पुढे कोणतेही दायित्व संस्थेवर राहणार नाही.

८) कृती आराखडा :

१.नियोजन
- विद्यापीठ स्तरावर ऑनलाईन एम.पी.एस.सी. स्थापन करणे.
- निवड झालेल्या प्रशाकीय अधिकार्यांसह अनुभवी प्राध्यापक व तज्ञांना मार्गदर्शक म्हणून नियक्ती करणे.

२. तांत्रिक सुविधा
- पोर्टल व मोबाईल ॲप द्वारे प्रशिक्षण
- ऑनलाईन वर्गांचे थेट प्रक्षेपण व नंतर पाहता येणारी रेकॉर्डेड व्हीडीओ लेक्चर्स.
- ई-बुक्स, पीडीफ व डीजीटल नोटस उपलब्ध करून देणे.

३. प्रवेश प्रक्रिया
- महाविद्यालयांमार्फत विध्यार्थांची नोंदणी करणे.

४. बॅच व विद्यार्थी संख्या
- प्रति बॅच १०० अशा २० बॅच
- १० बॅच फाऊडेशन कोर्स आणि १० बॅच कम्बाइन

५. मूल्यमापन व अहवाल
- प्रत्येक महिन्याला ऑनलाईन चाचण्या.
- विद्यार्थ्याच्या प्रगतीचा अहवाल उपलब्ध करून देणे.
- यशस्वी विद्यार्थ्याना विद्यापीठाकडून डीजीटल प्रमाणपत्र देणे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड (महाराष्ट्र)

९) देयक प्रदान -

१. प्रशिक्षणसाठी निवड करण्यात आलेल्या संस्थेस कार्यारंभ आदेश दिल्यानंतर प्रशिक्षणाच्या विविध टप्यानुसार प्रशिक्षणासाठीच्या देयकाची अदायगी करण्यात येईल. याबाबत संस्थेसोबत करण्यात येणाऱ्या करारनाम्यामध्ये सविस्तर तपशिल नमुद करण्यात येईल.

२. सबंधितांना देयकाची रक्कम आर.टी.जी.एस द्वारे अथवा धनादेशाव्दारे अदा करण्यात येईल. सदर देयक अदा करतांना शासन नियमानुसार कपात करण्यात येणारे सर्व कर कपात करुन, उर्वरीत रक्कम सबंधितांना अदा करण्यात येईल, प्रशासकीय किंवा इतर कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास सदर देयक रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय राहणार नाही.

९) तांत्रिक मूल्यांकनासाठी पुढील कागदपत्रांच्या आधारे गुणांकन करण्यात येईल: -(एकूण गुण संख्या – १००)

| अ क्र | निकष | कागदपत्रे | माहिती | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | अनुभव: -नोंदणी प्रमाणपत्रानुसार संस्थेची स्थापना होऊन किमान ५ वर्षे पूर्ण झालेली असावीत. कोचिंग संस्थेस किमान ५ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे. | संस्था नोंदणीपत्र / शॉप ॲक्ट | किमान ५ वर्ष – ५ गुण<br>५ वर्षांहून अधिक अनुभव-१० | १० गुण |
| २ | संस्थेचे मागील वर्षांचे निकाल | अंतिम निकालात गेल्या ५ वर्षांत पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी. | ५ वर्षांतिल एकूण यशस्वी उमेदवारांची संख्या: a. ३०–५० पेक्षा कमी उमेदवार – ५ गुण b. ५० पेक्षा जास्त उमेदवार – १० गुण | १० गुण |
| ३ | आर्थिक उलाढाल | A. गेल्या 3 वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल (आर्थिक वर्ष २०२२-२३, आर्थिक वर्ष २०२३-२४, आर्थिक वर्ष २०२४-२५)<br>B. मागील ३ वर्षांचे प्रासिकर रिटर्न (ITR). | संस्थेची गेल्या ३ वर्षात सरासरी आर्थिक उलाढाल किमान रु. ६० लाख रुपये असणे आवश्यक आहे. | १० गुण |

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड (महाराष्ट्र)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | तज्ञ व्याख्याते | व्याख्यात्यांच्या शैक्षणिक अर्हतेबाबत कागदपत्रे, | A. किमान ५ वर्षे अनुभव असणारे ५ व्याख्याते: ३गुण<br>B. ५ तज्ञ व्याख्याते: ५ गुण<br>C. किमान १ व्याख्याता राज्य शासनाच्या सेवेत निवड झालेला आणि नेट व सेट उत्तीर्ण असावा (मात्र शासकीय सेवेत कार्यरत नसावा) - ७ गुण | १५ गुण |
| ५ | शासकीय संस्था सोबत कार्य केलेला अनुभव | काररनामे | १ करार : ५ गुण<br>२ व त्यावर अधिक : १० गुण | १० गुण |
| ६ | विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयासोबत कार्य केलेला अनुभव | कराररनामा / सामंजस्य करार | -------- | १० गुण |
| ७ | ऑनलाइन सुविधा | डिजिटल आणि दृक श्राव्य सुविधेचे geotag फोटो | मोबाइल ॲप्लिकेशन –४ गुण<br>वायफाय –२ गुण<br>डिजिटल बोर्ड –४ गुण | १० गुण |
| ८ | प्रेझेंटेशन आणि अप्रोच | सादरीकरणात बोली लावणाऱ्या व्यक्तीला या प्रशिक्षण कार्यक्रमाची पूर्ण समज असल्याचे सिद्ध करावे आणि त्यात खालील गोष्टींचा समावेश असावा:<br>-प्रशिक्षणाकडेएकूण दृष्टिकोन<br>-पायाभूत सुविधा<br>- मासिक, स्वतःचे / स्वतः प्रकाशित अभ्यास साहित्य /अभ्यासक्रमातील सर्व विषयांचासमावेश असलेली पुस्तिका /नोट्स , बहुपर्यायी प्रश्न बँक इ.<br>- चाचणी मालिकेचे वेळापत्रक, प्रस्तावित प्रशिक्षणासाठी योजनाकालावधी -व्याख्यानांचे वेळापत्रक प्रस्तावित प्रशिक्षणासाठीअभ्यासक्रम वेळेवर पूर्ण करणे सुनिश्चित करणे कालावधी. सादरीकरण वरील बाबी चा अभाव असेल तर कमी गुण येतील | सादरीकरणात EOI च्या सर्व निकषांचे प्रमुख पुरावे समाविष्ट असले पाहिजेत. | (जास्तीत जास्त) २५ गुण |

A. तांत्रिक गुणांकन/मुल्यांकन निकषांमध्ये किमान पात्रतेकरीता ७५ गुण (म्हणजे ७५ %) आवश्यक आहेत. किमान ७५ गुण (म्हणजे ७५%) मिळवणारे निविदाधारक हे संस्थेची प्रत्यक्ष तपासणी पात्र असतील, निविदाधारकांचे एकूण तांत्रिक गुणांकन / मूल्यांकन ७५% पेक्षा कमी असल्यास असे निविदा धारक संस्थेची पुढील प्रत्यक्ष तपासणी अपात्र असतील.

अंतिम निवड :

१. एक किंवा अधिक पात्र बोलीदारांना पॅनेलमध्ये समाविष्ट करू शकते किंवा त्यांच्या तांत्रिक गुणांच्या आधारे, आणि बोली मूल्यांकन समितीच्या शिफारशीच्या आधारे EOI रद्द करू शकते. निविदा धारकाचा शिफारस अहवाल कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, यांना सादर करेल.

२. निविदा मूल्यांकन समितीने निवडलेल्या निविदाधारकास (प्रशिक्षण संस्था) आवश्यकता असल्यास पुढील कार्यवाही करणे करिता आमंत्रित करेल .

३. कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, एका पात्र निविदाधारकास प्रशिक्षण देण्यासाठी समाविष्ट (empanel) करू शकेल किंवा निविदा मूल्यांकन समितीचा शिफारसीच्या आधार घेऊन किंवा कोणत्याही निविदाधारकाला प्रक्रियेतून रद्द करू शकेल.

४. कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, यांचे दिलेल्या निर्णय अंतिम असतील व सर्व निविदा धारकांना बंधनकारक असतील.

११) इतर बाबी :

१) परिस्थितीनुसार नवीन अटी करणे, बदल करणे किंवा आवश्यक ते बदल करण्याचा संपूर्ण अधिकार कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, यांना राहील.

२) या निविदा प्रक्रियेतून उद्भवणाऱ्या सर्व वाद विषयांच्या निपटाऱ्याबाबत संपूर्ण अधिकार व निर्णयाचा अधिकार कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, यांना राहील. न्यायक्षेत्र लातूर हे राहील.

३) निविदा स्वीकारण्याचा अधिकार कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, यांच्याकडे राहील.

४) निविदा रद्द करणे, तुद्ध ढकलणे किंवा रद्द करण्याचा याबाबत संपूर्ण अधिकार कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, यांना राहील.

५) प्रशिक्षण संस्थांची निवड करताना गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण, पारदर्शकता आणि समान हित या मूल्यांच्या आधारे संस्थांची निवड करण्यात येईल.

६) दंडाची रक्कम १० टक्के वसूल करण्याचा अधिकार कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, यांना असेल.

कुलसचिव,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड,

कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

# परिशिष्ट अ

संस्थेच्या माहितीचे विवरण पत्र

| | | |
|---|---|---|
| 1. | कोचिंग इन्स्टिट्यूटच्या मुख्य कार्यालयाचे नाव आणि पत्ता | |
| 2. | मालकाचे नाव | |
| 3. | संपर्क व्यक्तीचे नाव आणि पदनाम | |
| 4. | मोबाईलनंबर आणि ईमेलपत्ता | |
| 5. | संस्था / कोचिंग इन्स्टिट्यूटची स्थापना किंवा स्थापनातारीख | |
| ६ | अ) कोचिंग इन्स्टिट्यूट नोंदणीकृत आहे का? | |
| ७ | ब) जर हो, तर कोणत्या कायद्याअंतर्गत. प्रशिक्षण संस्था नोंदणीकृत आहे (कायदेशीरस्थिती) | |
| ८ | क) .नोंदणीक्रमांक | |
| ९ | ड) नोंदणीची तारीख | |
| १० | e) कालबाह्य तारीख | |
| ११ | अ) जीएसटी भरणारा आहे का (होय/नाही). | |
| १२ | ब) जीएसटीक्रमांक | |
| १३ | अ) आयकर भरणारा आहे का? (होय/नाही). | |

| | | |
|---|---|---|
| १४ | ब) संस्थेचा किंवा लागू असेल त्याप्रमाणे कायमचा खातेक्रमांक (पॅन) नमूद करा. | |
| १५ | आयकर विवरणपत्र आणि आर्थिक विवरणानुसार गेल्या ५ आर्थिक वर्षातील एकूण आर्थिक उलाढाल.<br>आर्थिक वर्ष २०१८-१९ ते आर्थिक वर्ष २०२३-२४ | |
| १६ | कोचिंगचा एकूण वर्षांचा अनुभव संस्था | |
| १७ | कोचिंग इन्स्टिट्यूट स्वतःच्या इमारतीत कार्यरत आहे की भाड्याच्या घरात? | |
| १८ | एकूण चौरस फूट बिल्ट-अप क्षेत्रफळ. | |
| १९ | वर्गखोलीत पुरेशी ऑडिओ आणि व्हिडिओ सुविधा उपलब्ध आहे का? | |
| २० | प्राध्यापकांची माहिती | |
| २१ | ग्रंथालय आणि अभ्यासिका कक्ष सुविधा | |
| २२ | गेल्या ५ वर्षात MPSC-नॉन-राजपत्रित गट ब आणि क सेवा परीक्षेच्या अंतिम निकालात यशस्वी उमेदवारांची एकूण संख्या किमान २० असावी. | |
| २३ | मोबाइल अॅप्स /वेबसाइट - चाचणीमालिका, नोंदणीकृत उमेदवारांच्या कामगिरीचा ऑनलाइन मागोवा घेणे, रेकॉर्ड केलेल्या सत्रासाठी APK/URL | |
| २४ | छापील अभ्यास साहित्य | |
| २५ | गेल्या ५वर्षात संस्थेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या. | |

दिनांक: ____________

निविदाधारकाची स्वाक्षरी व शिक्का

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड (महाराष्ट्र)

## परिशिष्ट ब

### बंधपत्र

(सदरचे हमीपत्र रु ५००/- च्या मुद्राकावर नोटरी करून ऑनलाइन सादर करावे)

मी / आम्ही गांभीर्यपूर्वक नमूद करतो की, मी / आम्ही वर नमूद केलेल्या निवेदनातील सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचले असून त्या निवेदनातील माझ्या / आमच्यावर नमूद केलेल्या परिशिष्ट मध्ये नमूद केले आहे / आहेत. जर माझी / आमची निवड स्वीकारण्यात आली तर त्या निवेदनातील सर्व अटी व शर्तींचे पालन करण्यास मी / आम्ही बांधील राहू. या अटी व शर्तींना भंग मी / आम्ही केल्यास या निवेदनातील अटी व शर्तींमध्ये दिलेल्या तपशीलानुसार मी / आम्ही दंडनीय कारवाईस पात्र राहू.

ही निवड स्वीकार झाल्यास मी / आम्ही दिलेल्या दर हे प्रशिक्षण कालावधीसाठी अमलात राहतील व या मुदती मध्ये हे दर स्वीकार केले गेल्यास त्या दराने प्रशिक्षण देण्यास मी / आम्ही बांधील राहू.

मी / आम्ही निवेदन नमूद तपशीलानुसार प्रशिक्षण देण्यासाठी व निवेदनातील अटी व शर्तींना बांधील राहू.

दिनांक: ___________

निविदाधारकाची स्वाक्षरी व शिक्का

संपूर्ण नाव: ____________________

पत्ता: ________________________

## परिशिष्ट क (१ )

प्रशिक्षण संस्था तपशील

| अ क्र | प्रशिक्षण संस्थेचे नाव | संस्थेचा अनुभव कालावधी | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|
| | | | |

दिनांक: ___________

निविदाधारकाची स्वाक्षरी व शिक्का

## परिशिष्ट क (2 )

प्रशिक्षकाचे तपशील

| अ क्र | प्रशिक्षकाचे नाव | शिक्षण | विषय | अनुभव | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

दिनांक: ___________

निविदाधारकाची स्वाक्षरी व शिक्का

परिशिष्ट ड

विद्यार्थी तपशील

| अ क्र | विद्यार्थी नाव | उत्तीर्ण परीक्षा | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले पद |
|---|---|---|---|---|
| | | | | |

दिनांक: ____________
निविदाधारकाची स्वाक्षरी व शिक्का

व्यापरी लिफाफा प्रपत्र "इ"

| अ.क्र. | तपशील | अंदाजित विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| 1 | Coaching Fees for Competitive Examination & Study Material for Examination | 2000 |

व्यापारी लिफाफा माहितीचा तपशील

१) ऑनलाईन सादर केलेले सर्व तांत्रिक कागदपत्रे तपसणीनंतर, निविदा समितीस निविदाकाराने सर्व अटी व कागदपत्राची पूर्तता केल्याचे आढल्यासच निविदाकाराने ऑनलाईन सादर केलेल्या व्यापरी माहितीची (दरांची) पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात येईल.

२)दर हे रुपयामध्ये दर्शवावे. एकदा दर सादर केल्यास त्यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही

***

Validate | Print | Help

# Rate BoQ

Tender Inviting Authority: Registrar, Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded.

Name of Work: E-Tender No.42-2025 for लातूर जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांना संयुक्त गट व व क परीक्षेची तयारी मराठीतून ऑनलाइन पद्धतीने प्रशिक्षण देणेकामी अनुभवी संस्थेची (अशासकीय/खाजगी ) निवड (Empanelment )करणेसाठी जाहीर ई-निविदा

Contract No: Estate/Sub-Center latur/training/ET-42-2025

( Rate should be Quot in Indian Rupee Only )

| Name of the Bidder/ Bidding Firm / Company : | |
|---|---|

**PRICE SCHEDULE**

(This BOQ template must not be modified/replaced by the bidder and the same should be uploaded after filling the relevent columns, else the bidder is liable to be rejected for this tender. Bidders are allowed to enter the Bidder Name and Values only )

| NUMBER # | TEXT # | NUMBER # | TEXT # | NUMBER # | NUMBER | NUMBER | NUMBER # | NUMBER # | TEXT # |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Item Description | Estimated Quantity per student | Units per No | BASIC RATE In Figures To be entered by the Bidder in Rs. P | GST (If applicable in Percentage) | GST Amount in Rs. P | TOTAL AMOUNT excluding taxes in Rs. P | TOTAL AMOUNT including taxes Rs. P | TOTAL AMOUNT In Words |
| 1 | 2 | 4 | 5 | 7 | 8 | 9 | 11 | 12 | 13 |
| 1 | लातूर जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांना संयुक्त गट ब व क परीक्षेची तयारी मराठीतून ऑनलाइन पद्धतीने प्रशिक्षण देणेकामी अनुभवी संस्थेची (अशासकीय/खाजगी ) निवड (Empanelment ) | | | | | | | | |
| 1.01 | Coaching Fees for Competitive Examination & Study Material for Examination (As Per Tender Document) | 1.00 | Nos | | | 0.00 | 0.000 | 0.000 | INR Zero Only |
| Total in Figures | | | | | | | 0.000 | 0.000 | INR Zero Only |
| Quoted Rate in Words | INR Zero Only | | | | | | | | |

कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड